www.rajdand.com
सातारा बुधवार
६. ३. २०२४
पृष्ठ ४ ! मुल्य ४ !
rajdandlive
Reg.No.MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
राजदंड
स्थापना १९९९

२५ वर्षे विश्वासार्हतेची

# महाराष्ट्र ५० वर्षांपासून तुमचा भार सोसतोय

## पहिल्याच सभेत अमित शाहांकडून शरद पवारांवर हल्लाबोल



**जळगाव:** पंतप्रधान मोदी यांच्या कार्यकाळातील १० वर्षांच्या कामाचा हिशेब विरोधकांकडून मागितला जातो. पण मी शरद पवारांना सांगू इच्छितो की, महाराष्ट्राची जनता गेल्या ५० वर्षांपासून तुमचा भार वाहत आहे. तुम्ही त्या ५० वर्षांचा सोडा पण साध्या पाच वर्षांचा तरी हिशेब जनतेला द्या. मग मोदींच्या १० वर्षांचा हिशेब मागा, अशा शब्दांत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी शरद पवार यांना लक्ष्य केले. अमित शाह हे सध्या दोन दिवसांसाठी महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आले आहेत. यावेळी त्यांनी जळगावमध्ये आयोजित करण्यात सभेत शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांना घराणेशाहीच्या मुद्द्यावरुन लक्ष्य केले.

ज्या पक्षांमध्ये लोकशाही नाही ते घराणेशाही असणारे पक्ष आहेत. असे पक्ष देशात लोकशाही ठेवतील का, असा सवाल अमित शाह यांनी विचारला. सोनिया गांधी यांना राहुल गांधींना पंतप्रधान करायचे आहे. उद्धव ठाकरे यांना आदित्यला मुख्यमंत्री करायचे आहे. शरद पवारांना त्यांच्या मुलीला मुख्यमंत्री करायचे आहे, ममता बॅनर्जींना आपल्या भाच्याला मुख्यमंत्री करायचे आहे, स्टॅलिन यांना त्यांच्या मुलाला मुख्यमंत्री करायचे आहे. मग या सगळ्यांपैकी तुमच्यासाठी कोण आहे? तुमच्यासाठी कोणी असेल तर ते फक्त पंतप्रधान नरेंद्र मोदी हेच आहेत, असे अमित शाह यांनी अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला.

### देशाच्या भविष्यासाठी, विकासासाठी मोदींना पंतप्रधान करा: अमित शाह

**शिवाजी महाराजांनी स्वकीय भावना निर्माण केली. देश आज जो उभा आहे त्याची पायभरणी शिवाजी महाराजांनी केली. २०२४ च्या निवडणुकीबाबतीत बोलण्यासाठी आलोय. मोदींना पुन्हा पंतप्रधान बनविण्यासाठी मतदान आहे या गैरसमजात राहू नका. २०२७ ला विकसित भारत बनविण्यासाठी मतदान आहे. भविष्यासाठी मतदान आहे, युवकांच्या भविष्यासाठी मतदान आहे. मोदींना पुन्हा पंतप्रधान करण्यासाठी मत आहे. पुलवामामध्ये आतंकवादी आले, १० दिवसांत पाकिस्तानमध्ये जाऊन सर्जिकल स्टाईक केले. ही मोदी गॅरंटी आहे. काश्मीर आपला हिस्सा आहे की नाही? ३७० कलम ७० वर्षे काँग्रेसने हटविले नाही. मोदींना दोनदा पंतप्रधान केले त्यांनी ३७० कलम हटविले. राहुल गांधी म्हणत होते कलम ३७० हटवले तर काश्मीरमध्ये रक्ताचे पाट वाहतील. पण रक्ताचे पाट सोडा, काश्मीरमध्ये एक दगड उचलण्याची हिंम्मत कुणाची झाली नाही, असे अमित शाह यांनी म्हटले.**

### वाराणसीतून १ हजार उमेदवारी अर्ज दाखल करणार

गेल्या काही दिवसांपासून मराठा समाज महाराष्ट्रातील अनेक मतदारसंघात प्रत्येक गावातील दोन उमेदवार उभे करण्याच्या तयारीत आहे. उमेदवारीवरुन बीड अशा प्रत्येक जिल्ह्यातही बैठका पार पडल्या होत्या. दरम्यान, आता परभणीतील बैठकीत मराठा समाजाकडून महत्वाचे निर्णय घेण्यात आलेत. मराठा समाज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविरोधात शड्डू ठोकण्याच्या तयारी आहे. कारण वाराणसी मतदारसंघात देखील परभणीतील मराठा समाज १ हजार उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या तयारीत आहे.

याबाबत मराठा समाजकडून ठराव मंजूर करण्यात आलाय. परभणी शहरातील भाग्यलक्ष्मी मंगल कार्यालयात आज परभणीतील मराठा समाजाची बैठक घेण्यात आली. या बैठकीला विविध संघटनाचे पदाधिकारी,मराठा बांधव मोठ्या संख्येने उपास्थित होते. यावेळी जिल्ह्यातून एक हजार मराठा उमेदवार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाराणसी मतदार संघातून उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

## हर्षवर्धन पाटलांच्या नाराजीमुळे अजित पवारांची अडचण?

**पुणे :** जसजशी लोकसभेची निवडणूक जवळ येऊ लागले आहे तसतशी बारामतील लोकसभेतील महायुतीतली खदखद समोर येऊ लागली आहे. या वर वेळीच उपाययोजना केली नाहीतर महायुतीतल्या गटबाजीचा फटका राष्ट्रवादीला बसणार हे निश्चित आहे. दोनच दिवसापूर्वी विजय शिवतारे यांनी महायुती संदर्भात वक्तव्य केलं आणि त्यानंतर हर्षवर्धन पाटील यांनी मित्र पक्षाकडून त्रास होत असल्याचं पत्र मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांना लिहिलं. त्यामुळे भाजप-सेनेच्या या नेत्यांचा नाराजीचा फटका राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाच्या उमेदवाराला बसण्याची शक्यता नाकारता येत नाही.



सुप्रिया सुळे आणि हर्षवर्धन पाटील सोलापूर जिल्ह्यातील एका विवाह प्रसंगी एकत्र आले. त्याला २४ तास उलटत नाहीत तोपर्यंत हर्षवर्धन पाटील यांनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांना लिहलेले पत्र समोर आले. त्यामुळे हर्षवर्धन पाटील विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेसचा संघर्ष थंबणार कधी असा प्रश्न निर्माण झाला आहे. राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांची तक्रार थेट हर्षवर्धन पाटील यांनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे.

हर्षवर्धन पाटील आणि राष्ट्रवादीचा संघर्ष जुना

हर्षवर्धन पाटील आणि राष्ट्रवादी संघर्ष जुना आहे. तिकीट मिळत नसल्याने हर्षवर्धन पाटील यांनी १९ मध्ये काँग्रेसला रामराम करीत भाजपमध्ये प्रवेश केला. पण हर्षवर्धन पाटील आणि राष्ट्रवादी काँग्रेस संघर्ष कायम राहिला. काही दिवसांपूर्वी अंकिता पाटील यांनी आमच्या पाठीत खंजीर खुपसला असे वक्तव्य केले आणि पुन्हा एकदा राष्ट्रवादी विरुद्ध भाजप संघर्ष पुन्हा एकदा सुरू झाला.

हर्षवर्धन पाटील यांच्यावर राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाचे तालुकाध्यक्ष हनुमंत कोकाटे यांनी थेट एका सभेदरम्यान एकेरी शब्दात टीका केली, तसेच शिव्यांची लाखोली वाहिली. त्यानंतर त्याला हर्षवर्धन पाटलांच्या कन्येने म्हणजे अंकिता पाटील यांनी जशास तसं उत्तर देण्याचं वक्तव्य केलं.

अजित पवारांचा कार्यकर्त्यांना सबुरीचा सल्ला

खासदार सुप्रिया सुळे यांच्या विरोधात सुनेत्रा पवार उभा राहणार असल्याचे चर्चा जोर धरत असतानाच राष्ट्रवादी विरुद्ध भाजपा संघर्ष उफाळून येत आहे. त्यानंतर आगामी काळात हा संघर्ष आणखी तीव्र होऊ शकतो अशी शक्यता असतानाच अजित पवारांनी इंदापुरात मेळावा घेतला आणि कार्यकर्त्यांना मित्र पक्षांशी जुळवून घ्या असे सांगितले.

अजित पवारांच्या आदेशानंतर हा संघर्ष कमी होईल असे वाटत असतानाच हर्षवर्धन पाटील यांनी लेटर बॉम्ब टाकला आणि पुन्हा एकदा चर्चांना उधाण आले. यावर हा महायुतीतला विषय आहे बसून मार्ग काढू अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष प्रदीप गारटकर यांनी दिली आहे.

**संघर्ष निवळला नाही तर राष्ट्रवादीला फटका**


अजित पवारांचा आणि हर्षवर्धन पाटील यांचा संघर्ष जुना आहे. सध्या इंदापूरचे नेतृत्व राष्ट्रवादीचे आमदार दत्तात्रय भरणे करतात. राष्ट्रवादी विरुद्ध भाजपाचा सातत्याने इंदापुरात कलगीतुरा रंगताना दिसतो आहे. परंतु आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीले वितुष्ट परवडणारे नसेल. बारामती लोकसभा मतदारसंघातून सुनेत्रा पवार उभा राहणार असल्याची शक्यता जोर धरत असतानाच हा महायुतीतला संघर्ष निवळला नाही तर याचा फटका महायुतीला बसू शकतो.

निवडणूक तोंडावर असताना हर्षवर्धन पाटील यांनी लेटर बॉम्ब टाकला. हर्षवर्धन पाटील आणि अजित पवारांचा संघर्ष सर्वश्रुत आहे. तर दुसरीकडे सुप्रिया सुळे या हर्षवर्धन पाटील यांच्याशी सलोख्याचे संबंध जपून आहेत. आजपर्यंत ज्यांच्याशी संघर्ष केला त्यांच्याशी जुळवून घ्यायला दोन्ही गटाच्या कार्यकर्त्यांना अवघड जात आहे. त्यामुळेच हा संघर्ष वाढू लागला आहे. हा संघर्ष कायम राहिला तर याचा फायदा सुप्रिया सुळे यांना होणार हे नक्की.

### भाजपाच्या कोअर कमिटीची आज बैठक

**नवी दिल्ली :** आगामी लोकसभा निवडणुकीसाठी भाजपाने १९५ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. या यादीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह ३४ केंद्रीय मंत्र्यांच्या नावांचा समावेश आहे. मात्र, पहिल्या यादीत महाराष्ट्रातील एकही उमेदवार नाही.

लोकसभेच्या उर्वरित जागांच्या उमेदवारांबाबत भाजपाच्या कोअर कमिटीची बैठक (६ मार्च) होणार आहे. या बैठकीला भाजपा अध्यक्ष जेपी नड्डा आणि गृहमंत्री अमित शहा देखील उपस्थित राहू शकतात.



## भाजपच्या व्यासपीठावर अशोक चव्हाणांचा डेब्यू

### अमित शाहांच्या सभेत भाषणाचा पहिला मान पंकजाताईंना

**जळगाव :** गृहमंत्री अमित शहा यांचा दोन दिवसीय महाराष्ट्र दौरा सुरु आहे. लोकसभा निवडणुकीच्या दृष्टीने त्यांची पहिली सभा आज (दि.५) जळगाव जिल्ह्यात पार पडली आहे. त्यानंतर दुसरी सभा संभाजीनगर येथे पार पडली. संभाजीनगर येथील सभा विशेष ठरली आहे. कारण मोठ्या कालावधीनंतर भाजप नेत्या पंकजा मुंडे (झरपज्ञरक्षर चींपवश) भाजपच्या केंद्रीय नेतृत्वासमोर भाषण करताना दिसल्या आहेत. तर दुसरीकडे अशोक चव्हाणही (-हिेज्ञ उहरींरप) भाजपवासी झाल्यानंतर पहिल्यांदाच केंद्रीय नेतृत्वासमोर भाषण करताना दिसले आहेत. दोघेही संभाजीनगरच्या सभेमुळे चर्चेचा विषय ठरले आहेत.

आजवर भाजपच्या अनेक महत्वाच्या इव्हेंटमध्ये पंकजा मुंडे यांना संधी दिली जात नाही, अशी तक्रार त्यांच्या कार्यकर्त्यांकडून व्यक्त केली जात होती. आता मात्र, पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीने आणि त्यांच्या भाषणाने सर्वांचे लक्ष वेधलं आहे. पंकजा मुंडे यांनी भाषणातून पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांचे तोंडभरुन कौतुक केले आहे.

**सर्वाधिक जागा मराठवाड्यातील असतील**

अशोक चव्हाण काय म्हणाले, ४०० पेक्षा जो नारा लावला आहे त्यात, सर्वाधिक जागा मराठवाड्यातील असतील. यापूर्वी मराठवाड्यात आम्ही आमने-सामने होतो, आता सोबत काम करणार आहोत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकसित भारताचा नारा लावला आहे. त्याप्रमाणे आम्ही देखील मराठवाड्याला विकसित करण्यासाठी प्रयत्न करु. रस्त्यांचे काम झाले, शेतकऱ्यांसाठी निर्णय घेण्यात आले, फक्त आश्वासनच नाही तर काम झाली आहे. मागील दहा वर्षात जोरदार विकासाचे काम झाले आहे.

पुढे बोलताना चव्हाण म्हणाले, मी दुसऱ्या पक्षात असताना देखील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर वैयक्तिक टीका केली नाही. कारण त्यांनी विकासाचं काम केलं आहे. रावसाहेब दानवे यांनी मराठवाड्यात रेल्वे वाढवण्याचे काम केलं आहे. मराठवाड्याच्या विकासाच्या अनेक निर्णय घेण्यात आले. मराठवाड्यातील आणखी काही प्रश्न मार्गी लावायचे आहे. मराठा समाजाला या सरकारने दहा टक्के आरक्षण दिले आहे. सगेसोयरेचा विषय देखील कायदेशीररित्या मार्गी लागणार आहे यात मला शंका नाही. त्यामुळे मिळून काम करुयात.

## राजुरी ग्रामस्थांचा ‘रास्ता रोको’चा इशारा

**राजुरी :** येथील गावची लोकसंख्या पंधरा हजाराहून अधिक असून या ठिकाणी दोन महाविद्यालये तसेच, पराशर कृषी पर्यटन केंद्र असल्याने येथील बस स्थानकावर प्रवाशांची गर्दी असते. परंतु बसस्थानकावर लांब पल्ल्याच्या कुठल्याही बसेस थांबत नसल्याने प्रवाशांची गैरसोय होत आहे.

येथील ग्रामपंचायत व ज्येष्ठ नागरिक संघटनेच्या वतीने माजी सभापती दीपक औटी, सरपंच प्रिया हाडवळे, उपसरपंच माऊली शेळके यांच्यावतीने कल्याण आगार, नारायणगाव आगार व शिवाजीनगर आगार प्रमुखांना राजुरी या ठिकाणी बस थांबत नसल्याचे पत्र देण्यात आले होते.

त्यानंतर वरील तीनही आगार प्रमुखांद्वारे येथील बसस्थानकावर पारनेर, जामखेड, श्रीगोंदा, पाथर्डी, कल्याण, ठाणे, मुंबई, नारायणगाव, राजगुरुनगर या डेपोंच्या बसेस राजुरी या ठिकाणी थांबविण्याच्या सूचना एस. टी. चालक, वाहक यांना दिल्या होत्या तसेच, या संदर्भाचे पत्र देखील येथील ग्रामपंचायत कार्यालयास देण्यात आले होते.

परंतु येथील बसस्थानकावर थांबा परवाना असताना देखील व आगार प्रमुखांनी याबाबतच्या सूचना दिलेल्या असताना देखील बसेस थांबत नसल्याने ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली आहे.

दरम्यान, येथील ग्रामस्थांनी कल्याण-नगर या मार्गावर राजुरी या ठिकाणी १३ सप्टेंबर रोजी ग्रामस्थ व प्रवाशांनी रास्ता-रोको आंदोलन केले होते. तेव्हा संबंधित आगार प्रमुखांनी यापुढे सर्व बस राजुरी या ठिकाणी थांबतील असे सांगितले होते. पुढे दहा ते पंधरा दिवस सर्व बसेस थांबत होत्या. मात्र, त्यानंतर परत पहिल्या सारख्या बस थांबायच्या बंद झाल्या आहेत.

या ठिकाणी बस थांबत नसल्याने येथील ग्रामस्थांना, प्रवाशांना आळेफाटा पर्यंत तसेच, बेल्हा या ठिकाणांपर्यंत खासगी वाहनाने जादा पैसे देऊन जावे लागत होते. या ठिकाणाहून जाणाऱ्या सर्व बसेस थांबविण्यात याव्यात अन्यथा कल्याण-नगर या राष्टीय महामार्गावर राजुरी या ठिकाणी आंदोलन केले जाईल असा इशारा येथील ग्रामस्थांनी दिला आहे.

## मला शिर्डीतून लोकसभेची उमेदवारी द्या: रामदास आठवले

**शिर्डी :** कोणत्याही परिस्थितीत लोकसभा निवडणूक लढवायचीच, असा चंग बांधलेले रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (रिपाई) सर्वेसर्वा रामदास आठवले यांनी आता महायुतीसमोर एक नवा प्रस्ताव ठेवला आहे. रामदास आठवले यांना शिर्डी लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवायची आहे. पण या जागेवर सध्या शिंदे गटाचे सदाशिव लोखंडे हे खासदार आहेत. त्यामुळे ही जागा पुन्हा एकदा शिंदे गटाच्या वाट्यालाच येण्याची शक्यता आहे. मात्र, या जागेवरुन मला लोकसभा निवडणूक लढवू द्या. माझी राज्यसभेतील आणखी दोन वर्षांची टर्म बाकी आहे. त्याठिकाणी सदाशिव लोखंडे यांना राज्यसभेवर पाठवावे, असा प्रस्ताव रामदास आठवले यांनी मांडला आहे. आता महायुती हा प्रस्ताव मान्य करुन रामदास आठवले यांना शिर्डीतून संधी देणार का, हे पाहावे लागेल.

रामदास आठवले हे सध्या अहमदनगरच्या दौऱ्यावर आहेत. ते मंगळवारी शिर्डीत असताना त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी म्हटले की, महायुतीमधील घटकपक्षांनी जागावाटपावरुन फार खेचाखेची करु नये. भाजप कोणताही पक्ष संपवायला निघालेला नाही. नरेंद्र मोदी हे तिसऱ्यांदा पंतप्रधान होणार आहेत. मला शिर्डीमध्ये संधी मिळाली तर या भागाचा विकास करण्यासाठी मंत्री असताना मला चांगली संधी उपलब्ध होईल. शिर्डी संस्थानाला बळकट

## शरद पवार १३ मार्चला नाशिकमध्ये

### लोकसभा निवडणुकीची तुतारी फुंकणार



**नाशिक :** अत्यंत सधन आणि प्रयोगिक शेतीत अग्रेसर असलेला नाशिक जिल्ह्यातील निफाड हा तालुका राजकीय दृष्ट्या देखील सजग आहे आगामी लोकसभा निवडणूकीच्या पाश्र्वभूमीवर राष्ट्रवादीचे नेते शरद पवार याच मतदार संघात निवडणूकीच्या रणाला प्रारंभ होत असल्याची तुतारी फुंकणार आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या दृष्टीने नाशिक जिल्हा अत्यंत महत्वाचा असून निफाड तालुका हा शरद पवार यांना मानणारा आहे. कृषीच्या प्रयोगांना शरद पवार यांनी नेहमीच पाठबळ दिले आहे त्यातच सध्या तर कांदा निर्यात बंदीचा विषय गाजत आहे. निफाड तालुक्यातील लासलगाव ही आशिया खंडातील सर्वात मोठी कांद्याची बाजारपेठ मानली जाते. या ठिकाणी राजकारण तापले आहे. त्यातच शेतमालाला भाव, अवकाळीचे नुकसान असे अनेक प्रश्न शेतकऱ्यांना भेडसावत असताना शरद पवार यांची अचूकपणे निफाडचीच निवड जाहिर सभेसाठी केली आहे.

शरद पवार हे या मतदार संघात शेतकरी मेळावा घेणार असले तरी खऱ्या अर्थाने ते निवडणूक रणांगणावर तुतारी फुंकणार आहेत. या सभेसाठी निफाड किंवा लासलगाव या पैकी एका जागेची निवड करण्यात येणार असल्याची माहिती राष्ट्रवादीचे नेते गोकूळ पिंगळे यांनी दिली.

पाहिजेत
राजदंड
२५ वर्ष सातत्याने प्रसिद्ध होणाऱ्या दै राजदंडसाठी पश्चिम महाराष्ट्रात तालुका व जिल्हा प्रतिनिधी नेमणे आहे. आपल्या परिसराची भौगोलिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक जाण असलेल्या, मराठी भाषेवर प्रभुत्व असलेल्या आणि जनसंपर्क असलेल्या उमेदवारांनी संपर्क साधावा. उमेदवार पदवीधर असावा. पत्रकारिता व जनसंपर्क विषयात प्रशिक्षण घेतलेल्या व माध्यम क्षेत्रात किमान अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य
संपर्क: rajdand.pune@gmail.com

## ग्रोन्युज परिवार चॅरिटेबल ट्रस्ट फलटण आयोजित ७ वे

# धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज राज्यस्तरीय साहित्य संमेलन

शत्रूचा पराभव हा रणात नव्हे तर अगोदर मनात व्हावा लागतो त्यावेळी खरी लढाई जिंकता येते आणि हे सर्व वाचनाने व मनन केल्यामुळे घडते.

इतिहास साक्षीला आहे. साहित्यामुळे एक नव्हे तर आपले दोन छत्रपती घडले आणि हिंदवी स्वराज्य स्थापन झाले. छत्रपती संभाजी महाराजांचे साहित्य योगदान ग्रंथ व शौर्यासोबत रसिकतेची कास यामुळे अद्वितीय व्यक्तिमत्व घडले. आजचे साहित्य संमेलन खास आहे कारण यामध्ये छत्रपतींचे नाव आहे. आज प्रत्येक घरात सुसंस्कारी पिढी निर्माण होण्यासाठी मुलांच्या रिकाम्या वेळी मोबाईल ऐवजी पुस्तके द्या, वाचनास प्रवृत्त करा. साहित्याने मन अन् मस्तक घडवले जाते आणि म्हणूनच छत्रपती शिवाजी महाराजांनी युवराज संभाजीराजे यांना राज्यकारभाराबरोबर १६ परकीय भाषांवर प्रभुत्व निर्माण करण्याची संधी दिली. साहित्य साधनेने गुराख्याचा महाकवी



कालिदास झाला व मेघदूत काव्याची निर्मिती झाली असे प्रतिपादन प्रसिद्ध व्याख्याते प्रा.श्री. नितीन बानगुडे पाटील यांनी सत्काराला उत्तर देताना सांगितले.

ग्रोन्युज परिवार चॅरिटेबल ट्रस्ट फलटण आयोजित ७ वे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज राज्यस्तरीय साहित्य संमेलन जागतिक मराठी राजभाषा दिनानिमित्त फलटण येथे पार पडले. यावेळी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज साहित्य सेवा जीवन गौरव पुरस्कार शिवचरित्रकार प्रा.श्री. नितीन बानगुडे पाटील यांना मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर तपोनिधी महंत शिवयोगी नंदगिरी महाराज, ज्येष्ठ साहित्यिक जगन्नाथ शिंदे, संमेलनाध्यक्ष अविनाश चव्हाण, संयोजक प्रा. रविंद्र कोकरे, प्रा. विनय काकडे, ट्रस्टचे अध्यक्ष प्रकाश सस्ते व असंख्य साहित्यिक उपस्थित होते.

यावेळी बोलाताना तपोनिधी महंत शिवयोगी नंदगिरी महाराज म्हणाले की वाचस्पती यांच्या भामती साहित्यरचनेपासून आजपर्यंत अनेकांनी साहित्य समृद्ध करण्यात मोठे योगदान दिले. संस्कार व संस्कृतीचे जतन साहित्यामुळे होते म्हणून प्रत्येकाने आयुष्याला साहित्याची जोड द्यावी. अध्यात्मामध्येही साहित्याचे विविध पैलू पाहण्यास मिळतात.

यावेळी राष्ट्रमाता जिजाऊ आदर्श माता, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जीवन गौरव पुरस्कार, तर धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज विशेष साहित्य सेवा, उत्कृष्ट साहित्यसेवा पुरस्कार, निबंध स्पर्धेतील विजेत्यांना तपोनिधी महंत शिवयोगी नंदगिरी महाराज व जगन्नाथ शिंदे यांचे शुभहस्ते पुरस्कार प्रदान करून महाराष्ट्रातून निवडलेल्या साहित्यिकांचा गौरव करण्यात आला.

दुसऱ्या सत्रात रानकवी हणमंत चांदगुडे यांचे अध्यक्षतेखाली व प्रसिद्ध कवयित्री आधुनिक बहिणाबाई विमल माळी यांचे उपस्थितीत बहारदार काव्यसंमेलन पार पडले. यामध्ये सातारा, पुणे, कोल्हापूर, मुंबई, सोलापूर येथील कवींनी उत्स्फूर्त सहभागी होऊन काव्य संमेलनाची रंगत वाढवली. यावेळी गडचिरोली, वर्धा, नागपूर, बुलढाणा,नाशिक, सोलापूर, पुणे, कोल्हापूर, सातारा, ठाणे येथील साहित्यिक कवी उपस्थित होते.

साहित्य संमेलन यशस्वी पाडण्यासाठी ज्ञानेश्वर देशमुख, काशिनाथ ढेंबरे, प्रा. विजय काकडे यांनी परिश्रम घेतले तर समारोप प्राचार्य पंढरीनाथ कदम व प्रा. डॉ. अशोक शिंदे यांचे आभार प्रदर्शनाने पार पडला. यावेळी सूत्रसंचालन जेष्ठ कवी ज. तू. गार्डी व सौ सुलभा सस्ते यांनी केले.

# पिंपरी-चिंचवडच्या १३ पोलिस निरीक्षकांच्या बदल्या रद्द

**पिंपरी :** आगामी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्यातील १३० पोलिस निरीक्षकांच्या इतर घटकांमध्ये बदल्या केल्या होत्या. त्याबाबत काही अधिकाऱ्यांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणकडे (मॅट) धाव घेतली. मॅटच्या आदेशानंतर बदली झालेल्या ६५ पोलिस निरीक्षकांच्या बदल्या रद्द केल्या. त्यामध्ये पिंपरी-चिंचवड पोलिस दलातील १३ पोलिस निरीक्षकांचा समावेश आहे.

आगामी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पोलिस महासंचालक कार्यालयाकडून सर्व घटक प्रमुखांकडून बदलीपात्र पोलिस निरीक्षकांची माहिती मागवली होती. त्या माहितीच्या आधारे पोलिस महासंचालक कार्यालयाकडून राज्यातील १३० पोलिस निरीक्षकांची त्यांच्या घटकातून इतर घटकात बदली केली होती. या बदली आदेशाच्या विरोधात काही पोलिस निरीक्षकांनी मॅटमध्ये धाव घेतली.

मॅटने राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना बदली आदेशाची पडताळणी करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार २१ फेब्रुवारी रोजी मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी संबंधित घटक प्रमुखांची बैठक घेतली. त्यानंतर पुणे शहर (२), पिंपरी-चिंचवड (१३), ठाणे शहर (७), विशेष पोलिस महानिरीक्षक कोल्हापूर परिक्षेत्र (१) अशा एकूण २३ पोलिस निरीक्षक जे २१ डिसेंबर २०२३ रोजी संबंधित घटकात कार्यकारी पदावर कार्यरत होते. त्यांना आयोगाच्या निकषाप्रमाणे जिल्ह्याबाहेर बदली करण्यापासून सवलत असल्याचे मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी सांगितले.

मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या आदेशानंतर महासंचालक कार्यालयाकडून देखील ४२ पोलिस निरीक्षकांची बदलीबाबत पडताळणी केली.

# आता सरकारकडे मागू नका, सरकार कोणते आणायचे ठरवा'; नाना पाटेकरांचे शेतकऱ्यांना आवाहन

**नाशिक :** देशात सुरू असलेल्याशेतकरी आंदोलनात बॉलिवूड आणि मराठी अभिनेतेनाना पाटेकरयांनीही पाठिंबा दिला आहे. यावेळीनाना पाटेकरयांनी शेतकऱ्यांना महत्वाचं आवाहन केलं आहे. आता वेळ आली आहे की, शेतकऱ्यांनी काहीही न मागता, त्यांना देशात कोणाचे सरकार आणायचे आहे, हे ठरवावे, असं नाना पाटेकर म्हणाले.

शेती अर्थ प्रबोधिनीद्वारा नाशिक येथे ११वे अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या संमेलनाच्या उद्घाटन सत्रात नाना पाटेकर बोलत होते. यावेळी पाटेकरांनी रोखठोक भूमिका मांडली आहे.



नाना पाटेकर यावेळी शेतकऱ्यांची बाजू घेत ते म्हणाले की, पूर्वी ८०-९०% शेतकरी होते, आता ५०% शेतकरी आहेत. आता सरकारकडे काही मागू नका. आता कोणाचे सरकार आणायचे ते ठरवा. मी राजकारणात जाऊ शकत नाही कारण माझ्या पोटात जे असेल ते तोंडावर येईल. ते माझी पक्षातून हकालपट्टी करतील. पक्ष बदलल्याने महिनाभरात सर्व पक्ष संपुष्टात येतील. इथे आम्ही तुमच्यासमोर म्हणजे, आमच्या शेतकरी बांधवांसमोर मनापासून बोलू शकतो, असं नाना पाटेकर यांनी सांगितले.'मी शेतकरी म्हणून जन्म घेईन'शेतकऱ्यांशी संवाद साधताना नाना पुढे म्हणाले, मी आत्महत्या केली तरी शेतकरी म्हणून जन्म घेईन, शेतकरी कधीच म्हणणार नाही की मला शेतकरी म्हणून जन्म घ्यायचा नाही. आम्हाला जनावरांची भाषा कळते, शेतकऱ्यांची भाषा वेळेत कशी बोलावी हे कळत नाही का?, असा सवालही नाना पाटेकर यांनी उपस्थित केला.१० मार्च रोजी 'ट्रेन रोको'-शेतकऱ्यांनी त्यांच्या 'दिल्ली चलो' मोर्चाचे नवीन वेळापत्रक जाहीर केले आहे. देशभरातील शेतकऱ्यांना ६ मार्चला दिल्ली गाठण्याचे आवाहन शेतकरी नेत्यांनी केले आहे. शेतकरी आंदोलकांनी १० मार्च रोजी 'ट्रेन रोको' आंदोलनाची घोषणाही केली आहे. तसेच सीमाभागातील शेतकऱ्यांची संख्या आणखी वाढविण्यात येणार असल्याचे सांगितले.

# राधानगरी धरणात ६१, तर 'काळम्मावाडी'त ५१ टक्क्यांपर्यंत पाणीसाठा

**राधानगरी :** धरणांचातालुका म्हणून राधानगरीची ओळख आहे. तालुक्यात असणाऱ्या तीनधरणांमुळेकोल्हापूरजिल्हा सुजलाम् सुफलाम् झाला. महाराष्ट्रातील अतिशय भक्कम जलाशय म्हणून राधानगरी धरण ओळखले जाते.

राधानगरी धरणात सध्या ६१.०३ टक्के म्हणजे १३४.२५ दलघमीपाणीसाठाशिल्लक असून, गेल्यावर्षी याच दिवसांमध्ये धरणात १३६.४६ दलघमी (४.८२ टीएमसी) पाणीसाठाहोता. यंदाही जवळपास ४.७४ टीएमसी साठा आहे. उन्हाळ्यामध्ये सलग पंधरा दिवस राधानगरी धरणातून ८०० ते १००० क्युसेक पाणी भोगावती नदी पात्रात सोडले जाते. हे



धरणकोल्हापूरजिल्ह्यासाठी वरदान असून, शेतीसह पिण्याचे पाणीसुद्धा याच धरणातून वापरले जाते.

आता कोल्हापूरला काळम्मावाडी धरणातून पाणी पोहोचणार आहे. तालुक्यातील असणारे तुळसी जलाशय धामोड खोऱ्यातील शेतीची तहान भागवते. यामुळे धामोड नदीकाठाची गावे आर्थिकदृष्ट्या सबळ झाली आहेत. तालुक्यातील धरणांमुळे आजवर पाणीबाणी जाणवली नसली तरी मार्च महिन्याच्या सुरुवातीलाच वाढत असलेल्या तापमानामुळे पाणीसाठा कमी होऊ शकतो.

सध्या काळम्मावाडी (दूधगंगा) धरणात ५१.८३ टक्के तर तुळसी जलाशयात ६६ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. शिल्लक असणारा पाणीसाठा तीन महिने जपून वापरावा लागणार आहे. अलीकडे वाढत असलेल्या तापमानामुळे राधानगरी तालुक्यात पावसाचे प्रमाण पूर्वीपेक्षा खूपच कमी झाले आहे. गतवर्षीप्रमाणे जर जून महिना कोरडा गेला तर पाणीटंचाई जाणवणार आहे. त्यामुळे पाण्याचे नियोजन करावे लागणार आहे.

# महावितरण शिरोळ उपविभागात लाइनमन दिवस उत्साहात साजरा

**शिरोळ :** दरवर्षी केंद्र शासनाच्या सूचनेनुसार महावितरण कंपनीच्या सर्व कार्यालयात लाईनमन दिवस साजरा करण्यात येतो. यानुसार यावर्षीचा लाईनमन दिवस मोठ्या उत्साहात महावितरणच्या शिरोळ उपविभागात साजरा करण्यात आला. उपविभागातील सर्व लाईनमन यांचा प्रमुख पाहुणे आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर गणेश गलांडे यांच्या अध्यक्षतेखाली यथोचित सत्कार करून ग्राहक जनजागृती बाबत बाजारपेठेतून प्रभात फेरी काढली. या फेरीत सुरक्षितता आणि वीज बचती बाबतच्या घोषणा देण्यात आल्या.

. यावेळी आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर यांनी उपस्थित सर्व लाईनमन यांना शुभेच्छा दिल्या. शिवाय गणेश. . गलांडे मार्गदर्शन करताना म्हणाले की,महाराष्ट्राला प्रकाश देणाऱ्या या प्रकाश दूतांचा सत्कार होत



शिरोळ येथे लाईनमन दिनानिमित्त मार्गदर्शन करताना सहाय्यक अभियंता दीपक जमणे

असताना आम्हाला आनंद होत आहे.महावितरणचे काम करित असताना सुरक्षिततेचे काळजी घेऊन काम करण्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

यावेळी सर्व शाखा कार्यालयातील लाईनमन यांनी आपले मनोगत व्यक्त करताना लाईनमन दिवसानिमित्त होत असलेल्या सत्काराबाबत आनंद व्यक्त करून लाईनमन यांचे काम धोकादायक आहे तरी सर्वांनी काळजीपूर्वक काम करण्याचे आवाहन केले. सर्व शाखाधिकारी यांनी आपले मनोगत व्यक्त केले व लाईनमन दिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमा अगोदर आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नि.लि.लेखा . जाफर नदाफ यांनी केले. प्रास्ताविक सहाय्यक अभियंता दीपक. जमने यांनी केले. वरिष्ठ तंत्रज्ञ . तुकाराम बनबरे यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मा. . , . पांढरे , . , सौ. राजगे मॅडम, . रमेश माने, . जाफर नदाफ, . शिवाजी पाटील, . गजानन कोळी व . शहाजी गावडे यांनी केले.

## वारकऱ्यांसाठी हक्काचं निवासस्थान

# खेडीमध्ये ५५ एकरवर 'वारकरी भवन'चे भूमिपूजन

**जळगाव :** मुक्ताईनगरमध्ये मुख्यमंत्रीएकनाथ शिंदेयांच्या हस्ते तापी नदीवरील पुलाच्या शुभारंभाचा कार्यक्रम पाडला. त्यानंतर,जळगावजिल्ह्यातील खेडी येथे उभारण्यात येणार असलेल्या भव्य 'वारकरीभवना'चे भूमिपूजनही मुख्यमंत्र्यांच्याहस्ते करण्यात आले. उत्तरम महाराष्ट्रातील हे पहिलेच एवढे मोठेवारकरीभवन असून पंढरीच्या वारीसाठी विठु-माऊलीच्या दर्शनाची आस घेऊन वारी करणाऱ्या वारकऱ्यांना या भवनच्या माध्यमातून हक्काचं निवासस्थान उपलब्ध होत आहे.-

जळगाव ही संताची भूमी असून या आध्यात्मिक नगरीत भव्य वारकरी भवन तयार होत आहे. राज्यात वारकरी संप्रदाय खूप मोठा असून तो गावोगावी अंखड हरिनाम सप्ताहाच्या माध्यमातून, त्यातील किर्तनाच्या माध्यमातून अतिशय दुर्गम भागात देखील पांडुरंगाचे नामस्मंरण करुन समाज प्रबोधनाचे काम करत आहे. उत्तर महाराष्ट्रात ५५ एकरावर हे पहिलेच 'वारकरी



भवन' उभारले जात असून त्यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून ६ कोटी ६ लाख रुपयांचा निधी देण्यात आला आहे. हे वारकरी भवन पूर्ण होईपर्यंत त्याला निधीची कमतरता पडू देणार नाही, अशी ग्वाही यावेळी मुख्यमंत्री शिंदेंनी दिली.

पंढरपुरचा विकास होत असतांना राज्यातील इतर तीर्थक्षेत्रांचाही विकास करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. राज्यातील 'ब' वर्ग तीर्थक्षेत्रांचा विकास करण्यासाठी राज्य सरकारने अर्थसंकल्पात अडीच हजार कोटींची तरतुद केल्याची माहितीही यावेळी, मुख्यमंत्र्यांनी दिली. पंढरपुरचा विकास होत असतांना राज्यातील इतर तीर्थक्षेत्रांचाही विकास करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. राज्यातील 'ब' वर्ग तीर्थक्षेत्रांचा विकास करण्यासाठी राज्य सरकारने अर्थसंकल्पात अडीच हजार कोटींची तरतुद केली आहे.

**उत्तर महाराष्ट्रात ५५ एकरावर हे पहिलेच 'वारकरी**

**पंढरीच्या वारीसाठी आषाढी आणि कार्तिकी एकादशीला पंढरपूरला मोठी गर्दी होत असते. राज्याच्या कानाकोपऱ्यातून वारकरी भक्तजण पंढरपुरात दाखल होतात. लाखोंच्या संख्येने हे वारकरी पायी वारी करत इथे पोहोचतात. वाटेत अनेक ठिकाणी त्यांचा मुक्काम असतो. तर, अनेक मानाच्या पालख्या घेऊनही वारकरी संस्था पंढरीकडे येत असतात. जळगावमधून संत मुक्ताबाईंची पालखी हजारो वारकरी भक्तांच्या सोबतीने पंढरीत येत असते. आता, याच जळगाव जिल्ह्यातील खेडमध्ये उभारण्यात येत असलेले हे वारकरी भवन भक्तांसाठी उत्तम सोय म्हणून सेवेत दाखल होईल.**

# जलतज्ञ डॉ राजेंद्रसिंह राणा यांना डॉ आप्पासाहेब उर्फ सा रे पाटील समाजभूषण पुरस्कार

## भास्करराव पेरे - पाटील यांना समाजकार्य तर पै अमृता पुजारी हिला युवाप्रेरणा पुरस्कार जाहीर

**शिरोळ :** शिरोळ तालुक्याचे माजी आमदार व दत्त उद्योग समूहाचे शिल्पकार स्व आप्पासाहेब उर्फ सा रे पाटील यांनी शिरोळ तालुका व परिसरात शेतकरी सहकारी संस्थांच्या माध्यमातून समृद्धीची आणि संपन्नतेची बीजे रोवली डॉ सा रे पाटील यांनी आयुष्यातील ६० वर्षाहून अधिक काळ सार्वजनिक जीवनात अतुलनीय काम केले त्यांच्या कार्याचा आदर्श आजच्या तरुण पिढीला कळावा यासाठीच त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ. त्यांच्या नावे यावर्षीचा देण्यात येणारा डॉ अप्पासाहेब उर्फ सा रे पाटील समाजभूषण पुरस्कार जलतज्ञ डॉ राजेंद्रसिंह राणा तर समाजकार्य पुरस्कार भास्करराव पेरे पाटील यांना आणि युवा प्रेरणा पुरस्कार पै





अमृता पुजारी हिला देण्यात येणार आहे हा पुरस्कार वितरण सोहळा १ एप्रिल २०२४ रोजी सायंकाळी५ वाजता श्री दत्त शेतकरी सहकारी साखर कारखान्याच्या कार्यस्थळावरील कै दत्ताजीराव कदम कामगार कल्याण मंडळाच्या मैदानावर होणार असल्याची माहिती पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष विनोद शिरसाठ यांनी पत्रकार परिषदेत दिली .

यावेळी पत्रकार परिषदेत बोलताना विनोद शिरसाठ पुढे म्हणाले राज्याचे शिल्पकार स्व. यशवंतरावजी चव्हाण यांनी समृध्द आणि संपन्न महाराष्ट्राच्या उभारणीकरता सहकार-कृषी औद्योगिक समाज रचनेचे स्वप्न पाहिले. त्यांच्या याच स्वप्नांचा ध्यास घेवून, त्या पिढीतील कर्तृत्वसंपन्न सहकारमहर्षी श्री दत्त उद्योग समुहाचे शिल्पकार स्व. डॉ. आप्पासाहेब उर्फ सा. रे. पाटील यांनी शिरोळ तालुका आणि परिसरात शेतकरी सहकारी संस्थाच्या माध्यमातून समृध्दीची आणि संपन्नतेची बीजे रोवली. या सहकारी संस्थामुळेच शिरोळ तालुका आणि परिसराची आज देशभरात समृध्दी व संपन्नतेची बेटे अशी ओळख निर्माण झाली आहे. स्व डॉ आप्पासाहेब उर्फ सा. रे. पाटील हे आपल्या आयुष्यातील सन १९५० ते २०१५ असा ६० वर्षाहून अधिक काळ सार्वजनिक जिवनात वावरले. महाराष्ट्र विधानसभेचे आमदार आणि श्री दत्त कारखान्याचे चेअरमन म्हणून त्यांनी दिर्घकाळ काम केले. परिसरात अनेक सहकारी संस्थांच्या उभारणीमध्ये व त्या यशस्वीरित्या चालविण्यामध्ये त्यांचा मोठा सहभाग राहिला. जयप्रकाश नारायण, साने गुरुजी, एस.एम. जोशी व अच्युतराव पटवर्धन यासारख्यांचा सहवास लाभल्याने आयुष्यभर एक ध्येयवाद समोर ठेवून नितीमुल्यांची जपणूक करत शेवटपर्यंत कार्यरत राहिले. दि.१ एप्रिल २०१५ रोजी डॉ अप्पासाहेब उर्फ सा रे पाटील यांचे निधन झाले. त्याच वर्षापासून त्यांच्या नांवाने समाजभूषण पुरस्कार देण्यास दैनिक युवकांचा नवा महाराष्ट्र परिवारकडून ४ वर्षे पुरस्कार देण्यात आला.

मुख्य "संपादक : नरेश विठ्ठल देसाई हे दैनिक राजदंड मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा. लि., सर्व्हे नं. १२९, हिस्सा नं. ११ / २ आणि १ / १३, वारजे पुणे - ४११ ०५८ येथे मुद्रित करून न्याती ग्रँडीयर, १०२ ग्रीनविच, कडनगर, उंड्री, पुणे -४११ ०६० येथून प्रकाशित केले. दैनिक राजदंडमधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. ("पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी) दूरध्वनी : पुणे (०२०)२६९०९०३१, इमेल-rajdand.pune@gmail.com
या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील.

# रमजानमुळे आखाती देशात हापूस आंब्याला वाढती मागणी

**रत्नागिरी :** हवामानातील बदलाचा परिणाम आंबा उत्पादनावर झाला असला, तरी वाशीमध्ये कोकणातील हापूस आंबा विक्रीसाठी दाखल होत आहे. मुस्लिम बांधवांचा पवित्र रमजान मास दि. १२ मार्चपासून सुरू होत असल्याने आखाती देशातून आंब्यासाठी मागणी वाढत आहे. त्यामुळे दर स्थिर राहण्याची अपेक्षा आहे. सोमवारी वाशी मार्केटमध्ये १८ हजार ५९ आंबा पेट्या विक्रीसाठी उपलब्ध होत्या. त्यात कोकणातून १३ हजार ५३२, तर अन्य राज्यांतील ४,५२७ पेट्यांचा समावेश आहे.

अवकाळी पाऊस, नीचतम तापमान, ढगाळ हवामानामुळे आंब्यावर कीडरोड, बुरशीसह तुडतुडा, थ्रीप्सचा प्रादुर्भाव झाल्याने यंदा आंबा पीक बंपर येण्याच्या आशेवर पाणी फिरले. नैसर्गिक दुष्टचक्रातून वाचलेला आंबा डिसेंबर, जानेवारीपासून विक्रीस येत आहे. फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यापासून पाच-दहा हजार पेटी दररोज वाशी मार्केटमध्ये विक्रीसाठी जात आहे. मात्र, त्यामध्ये निम्म्यापेक्षा अधिक आंबा कर्नाटक, केरळ, तामिळनाडू येथील आहे. उर्वरित ४० ते ४५ टक्के आंबा कोकणातील असून, त्यामध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्याचा आंबा अधिक आहे.

वाशी मार्केटमध्ये आलेल्या आंब्यापैकी ७० ते ७५ टक्के आंबा आखाती प्रदेशात पाठविला जातो. उर्वरित पाच टक्के मुंबईत, तर उर्वरित २० टक्के अन्य देशांत व राज्यात विक्रीसाठी पाठविला जातो. मुस्लिम देशामध्ये रमजानमुळे फळांना वाढती मागणी असते. यावर्षी हंगामाच्या सुरुवातीलाच रमजान असल्याने आंब्याला शेवटपर्यंत मागणी चांगली राहणार असल्याने दरही बऱ्यापैकी स्थिर राहणार असल्याचे विक्रेत्यांमधून सांगण्यात येत आहे.



## दर न परवडणारा

सध्या वाशी मार्केटमध्ये आंबा पेटीला दोन हजार ते पाच हजार रुपये दर मिळत आहे. खत, कीटकनाशके, वाहतूक खर्च, मजुरी, काढणी, पिंजरा (खोका) या सर्व बाबींचा विचार करता पेटीला मिळणारा दर परवडत नसल्याचे बागायतदारांकडून सांगण्यात येत आहे.

हवामानातील बदलाचा परिणाम आंबा पिकावर होतो. खत व्यवस्थापनापासून आंबा काढणी ते विक्रीसाठी पाठवेपर्यंत प्रचंड खर्च येतो. त्यामुळे आंब्याचे दर टिकून राहणे गरजेचे आहे. दर टिकले तर शेतकऱ्यांनी केलेला खर्च काहीअंशी भरून काढण्यासाठी मदत होणार आहे. - राजन कदम, बागायतदार

**आंबा लागवड क्षेत्र - ६६,४३३ हेक्टर**
**वार्षिक उत्पादन - एक ते सव्वा लाख टन**
**परदेशी विक्री - ६० हजार टन**
**स्थानिक विक्री - २० हजार टन**
**कॅनिग साठी - २० हजार टन**
**वार्षिक उलाढाल ७०० ते ८०० कोटी**

# दत्त शासकीय निमशासकीय कर्मचाऱ्यांच्या पतसंस्थेने कार्यालयायत, ठेवीदारांची ठेवी काढण्यासाठी झुंबड

**शिरोळ :** येथील दत्त शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांच्या पतसंस्थेमध्ये संस्थेचे ठेवीदार ठेवी काढून घेण्यासाठी संस्थेच्या कार्यालया कडे मागील दोन तीन महिन्यापासून दररोज मोठी गर्दी करत असून संस्था चालकाकडून उद्या देतो परवा देतो अशी टोलवाटोलवीची उत्तरे ठेवीदारांना दिली जात आहेत, ठेवीदारांचा ससेमीरा टाळण्यासाठी मागील पंधरा-वीस दिवसापासून संस्थेने कार्यालय बंद ठेवले असून संस्था चालकांच्या टोलवाटोलवीला कंटाळून काही ठेवीदारांनी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था व जयसिंगपूर पोलीस स्टेशन कडे धाव घेतली आहे, या संस्थेचा चेअरमन आणि जयसिंगपूर नगरपरिषदेचा कर्मचारी अनिल तराळ याने संस्थेत कोट्यावधी रुपयाचा घोटाळा केला असल्याची चर्चा ठेवीदार आणि सभासदांमध्ये सुरू असून २०२३ च्या लेखापरीक्षण अहवालामध्ये संस्थेचा चेअरमन अनिल तराळ व अन्य संचालकानी जवळपास पाच कोटी रुपयांचे चे कर्ज संस्थेकडून घेतले असल्याचे लेखापरीक्षण अहवाला मधून स्पष्ट होत आहे,

शासकीय आणि निमशासकीय कर्मचाऱ्यांची पतसंस्था असल्याने सामान्य ठेवीदारांनी विश्वासाने या संस्थेत ठेवी ठेवल्या होत्या पण सध्याची संस्थेची परिस्थिती पाहता संस्था ठेवीदारांना पैसे देण्यासाठी असमर्थ असल्याचे जाणवत आहे, यातील काही ठेवीदारांची भेट घेता त्यांनी जिल्हाधिकारी कोल्हापूर, जिल्हा पोलीस प्रमुख, जिल्हा निबंध कोल्हापूर, सहाय्यक निबंधक शिरोळ जयसिंगपूर पोलीस स्टेशन यांच्याकडे तक्रार दाखल करणार असून या संस्थेची सखोल चौकशी व्हावी व चेअरमन अनिल तराळ व संचालक मंडळ यांना तातडीने अटक व्हावी व यातील शासकीय सेवेत असलेल्या संचालकांना संस्थेची चौकशी पूर्ण होईपर्यंत निलंबित करावे अशी मागणी करणार असल्याचे ठेवीदारांकडून सांगण्यात येत आहे.

दरम्यान, पतसंस्थेचे चेअरमन अनिल तराळ यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले, सध्या पतसंस्थेकडून वसुली युद्धपातळीवर सुरू आहे. येत्या दोन महिन्यात सर्व सुरळीत होणार असून सर्वांनी आम्हाला सहकार्य करावे, कोणाचेही पैसे आम्ही बुडवणार नसल्याचे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले.

# पुढील शंभर वर्षे पाणी कमी न पडण्यासाठी प्रयत्नशील

**कळस :** इंदापूर तालुक्यातील खडकवासला कालव्याच्या सिंचनाचा प्रश्न सोडविण्यासाठी दुरदृष्टीने नियोजन करण्यात येत आहे. तालुक्याला पुढील शंभर वर्षे पाणी कमी पडणार नाही यासाठी आपण प्रयत्नशील आहोत. यासाठी ऋआगामी मिशन-इंदापूर सिंचनऋ राबविणार आहे, अशी ग्वाही आमदार दत्तात्रेय भरणे यांनी दिली.

खडकवासला कालव्याच्या पाण्याबाबत भरणे पुढे म्हणाले की, काही गोष्टी उघड करता येत नसतात, नाहीतर चांगल्या कामाला खोडा घालण्याचे प्रयत्न होतो. दिवसेंदिवस पुण्याची पाण्याची मागणी वाढत आहे. भविष्यात पुणे शहर आणखी झपाट्याने वाढणार आहे. यामुळे शहराची पाण्याची मागणी ९ टीएमसीवरुन २२ टीएमसीपर्यंत पोचली आहे. शहराला पिण्याच्या पाण्यासाठी कोणालाही विरोध करता येत नाही. परिणामी खडकवासला कालव्याचे पाणी इंदापूरला मिळणे मुश्किल होत आहे. यावर तोडगा काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मुळशीचे पाणी पुण्याला देणे किंवा कोकणात जाणारे पाणी पुण्याकडे वळविणे अशा पर्यायावर धोरणात्मक निर्णय प्रक्रिया आहे.



पाण्याबाबत राजकारण करण्यापेक्षा...

उजनीतून आता सोलापूरला पाणी दिले जाणार आहे. यामुळे उजनीची अवस्था यंदा गंभीर होईल. कालांतराने नीरा डावा कालव्याचा पाणी प्रश्न निर्माण होईल. यामुळे शेतकऱ्यांच्या सिंचन व्यवस्थेवर परिणाम होणार आहे. कालवा दुरुस्ती करून पाणी गळतीचे प्रमाण कमी करणे, पुण्याने वापरलेले पाणी शेतीसाठी वळविणे याबाबींवर काम करणे गरजेचे आहे. वास्तविक हे काम गेल्या पंधरा वर्षांपूर्वीच होणे महत्वाचे होते. मात्र, पाण्याबाबत राजकारण करण्यापेक्षा प्रत्यक्षात काम करणे महत्वाचे आहे, असे आमदार दत्तात्रेय भरणे यांनी सांगितले.

सध्या खडकवासला कालव्याचे एक आवर्तन दिले आहे. उन्हाळ्यात आणखी एक आवर्तन देण्याचे नियोजन आहे. हे दुसरे आवर्तनही तालुक्यात

## यशवंत सुरू करण्यासाठीचे मिशन, व्हिजन व नियोजन आमच्याकडेच

# कुठल्याही परिस्थितीत यशवंत सुरू करणारच : पैं. राहुल काळभोर

**मुंबई :** निवडणूक जाहीर झाल्यापासूनच निवडणूक बिनविरोध व्हावी या दृष्टीने ज्येष्ठ नेते माधव काळभोर, दिलीप काळभोर सुरेश घुले, महादेवराव कांचन व आम्ही सर्व मंडळींनी पुढाकार घेतला. राजकीय मतभेद असताना सुद्धा विरोधी गटाला बैठकांना बोलून बिनविरोध निवडणूकीसाठी अथक परिश्रम घेतले. परंतु काही राजकीय अस्तित्व सिद्ध करण्यासाठी उतावळी झालेल्या मंडळींनी या प्रयत्नांना खो घातला. राज्य व केंद्र सरकारच्या मदतीने यशवंतला जास्तीत जास्त मदत घेण्यासाठी अथक प्रयत्न करणार आहोत. या कामी देशाचे सहकार मंत्री अमित शहा, राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे उपमुख्यमंत्री अजित पवार, देवेंद्र फडणवीस यांच्याकडे दौंड तालुक्याचे आमदार राहुल कुल यांच्यामार्फत प्रयत्न करणार. नुकतेच केंद्र सरकारने देशभरातील ३३ सहकारी साखर कारखान्यांच्या १३७८ कोटी थकित कर्जाची पुनर्रचना करण्याची मान्यता दिली आहे. त्यातील ६१९ कोटींचे व्याज पूर्णपणे माफ केलेले आहे. पैकी महाराष्ट्रातील २० कारखान्यांचे ८६१ कोटी रुपये कर्ज पुनर्बांधणी केली जाणार आहे. याच धरतीवर केंद्र व राज्य सरकारची मदत घेऊन यशवंत सुरू करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार आहोत. ज्येष्ठ नेते माधव काळभोर यांनी सांगितल्याप्रमाणेच यशवंत सहकारी कारखान्याची एकही इंच जमीन न विकता राज्य व केंद्र शासनाच्या मदतीच्या आधारे कारखाना सुरू करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. यासाठी पुणे जिल्हा कृषी उत्पन्न बाजार समितीची मदत घेण्याचाही पर्याय उपलब्ध आहे.



जुने युनिट दुरुस्त करने किंवा प्रतिदिन २००० मे. टनाचे नवीन युनिट उभारण्याचे नियोजन आहे. कामगारांचे थकलेले वेतन व शेतकऱ्यांची प्रलंबित ऊस बिल देणे, ऊसतोड वाहतूकदारांचे थकलेले पैसे पूर्ण करणे ही आमची प्राथमिकता राहील. मयत सभासदांची वारसांची नोंद करून सभासदांच्या मुलांसाठी विविध योजना राबविणे व नावाने यशवंत असणाऱ्या आपल्या यशवंत कारखान्याला पुन्हा गत वैभव प्राप्त करून द्यायचे आहे. विरोधकांनी प्रचार सभांमध्ये टीका करण्यावर भर दिला असून रयत सहकार पॅनलने कारखाना सुरू करण्यावर भर देत त्याचे नियोजन आखले आहे.

पॅनल ची रचना करताना नव्वद टक्के तरुण, सुशिक्षित व सहकाराची जान असणारी मंडळी व दहा टक्के सहकारातला अनुभव असणारी मंडळी असे समीकरण करून सर्वपक्षीय उमेदवारांचा पॅनल तयार केला आहे.

तालुक्यातील जनतेने यशवंत सुरू करण्यासाठी व निवडणूक बिनविरोध करण्यासाठी आमचे प्रयत्न पाहिलेले आहेत त्यामुळे येणाऱ्या नऊ तारखेला किटली या चिन्हावर शिक्का मारून अण्णासाहेब मगर रयत सहकार पॅनल प्रचंड बहुमताने विजय होणार याची आम्हाला खात्री व विश्वास आहे.

# निलेश लंके 'घड्याळ' हाती बांधणार की 'तुतारी' फुंकून अजितदादांच्या कानठळ्या बसवणार?

**अहमदनगर :** 'लोकनेते लवकर निर्णय घ्या, दक्षिण नगरमध्ये महाराष्ट्राच्या स्वाभिमानाची 'तुतारी' वाजवा'. शरद पवार गटाचे खासदार अमोल कोल्हेंनी अजित पवार गटाच्या निलेश लंकेंना उद्देशून केलेल्या या वक्तव्यानंतर उपस्थित कार्यकर्त्यांच्या टाळ्या आणि शिट्ट्यांमध्ये मोठा राजकीय अर्थ आणि राजकीय भविष्यही दडलंय. कोल्हेंच्या या वक्तव्याने अजित पवार गटाच्या कानठळ्या बसल्या असतील, तर शरद पवार गटात उत्साह संचारला असेल. पण यामुळे महाराष्ट्र बुचकळ्यात मात्र पडला असेल. कारण शरद पवार गटाचे खासदार अमोल कोल्हेंनी हे जाहीर वक्तव्य केलंय ते अजित पवार गटाचे आमदार निलेश लंके यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमात. तेही थेट निलेश लंके यांच्या शेजारी उभं राहून.



खासदार अमोल कोल्हे यांनी निलेश लंके यांना शरद पवार गटातून निवडणूक लढण्याची खुली ऑफर दिली. त्यावेळी निलेश लंके यांच्या चेहऱ्यावरील भाव मात्र त्यांच्या पुढील राजकीय वाटचालीचे गर्भित अर्थ सांगताहेत. खरंतर महाराष्ट्राच्या आणि सर्वपक्षीयांच्या भुवया उंचावण्याची सुरूवात तेव्हाच झाली, जेव्हा निलेश लंकेंच्या कार्यक्रमाचे बॅनर झळकले तेव्हा.

निलेश लंके यांनी अहमदनगरमध्ये शिवपुत्र संभाजी महानाट्याचे आयोजन केले होते. त्याच्या बॅनरवर शरद पवारांचे फोटो दिसले आणि ते पाहणाऱ्यांनी मात्र आश्चर्य व्यक्त केलं. कारण नेता अजित दादांचा आणि कार्यक्रमाचं निमंत्रण शरद पवारांच्या खासदाराला. त्यात गल्लोगल्ली लागलेले हे बॅनर. त्यामुळे निलेश लंके अजितदादांच्या मळ्यातून शरद पवारांच्या तळ्यात उडी मारणार का? असा प्रश्न सगळ्यांनाच पडलाय.

या प्रश्नचिन्हाभोवती संभ्रमाचा गुंता आणखीच वाढवला तो सुप्रिया सुळे आणि रोहित पवारांनी. डॉ. अमोल कोल्हे यांचा नगरमध्ये कार्यक्रम सुरू आहे, ते अप्रत्यक्षपणे निलेश लंके यांना मदत करत आहेत. त्यामुळे लंके यांच्या उमेदवारीचा मुद्दा हा डॉ.अमोल कोल्हे यांनाच माहिती असेल. हळूहळू पुन्हा सर्व बॅनर वरती शरद पवारांचे फोटो दिसतील असं रोहित पवारांनी म्हटलं.

ही लोकशाही आहे, लोकशाहीमध्ये मी सगळ्यांच्या संपर्कात असते. लोकशाहीमध्ये डायलॉग आसलाच पाहिजे या मताची मी आहे, चर्चा विकास कामासाठी होत असते असं खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या.

# कोल्हापूर विमानतळ नव्या इमारतीचे १० मार्चला उद्घाटन

**कोल्हापूर:** येथील विमानतळाच्या नवीन टर्मिनल इमारतीचे उद्घाटन रविवार दि. १० मार्च रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाइन पद्धतीने होणार आहे. तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे या समारंभासाठी कोल्हापूरमध्ये उपस्थित राहणार आहेत. खासदार धनंजय महाडिक यांच्या कार्यालयाकडून ही माहिती देण्यात आली. सकाळी ११ च्या सुमारास हा कार्यक्रम होण्याची शक्यता आहे.

केंद्र शासनाने कोल्हापूरसह अन्य महत्त्वाच्या विमानतळांच्या विकासाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला होता. यामध्ये कोल्हापूरच्या विमानतळाचाही समावेश होता. यासाठी खासदार महाडिक यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. केंद्रीय हवाई वाहतूक मंत्री ज्योतिरादित्य सिंदिया यांनीही त्यांच्या गेल्या वर्षभरातील कोल्हापूर दौऱ्यामध्ये विमानतळाच्या कामाकडे जातीने लक्ष दिले होते. या पार्श्वभूमीवर कोल्हापूरच्या या ऐतिहासिक दिसणाऱ्या इमारतीचे उद्घाटन आता रविवारी होणार आहे.



यासाठी सिंदिया यांनी महाडिक यांना या कार्यक्रमासाठी विमानतळावर उपस्थित राहण्याचे निमंत्रण दिले आहे. कोल्हापूरसह पुणे, जबलपूर, ग्वाल्हेर विमानतळावरील इमारतींचे याच दिवशी लोकार्पण होणार असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे पुण्यात तर फडणवीस कोल्हापुरात उपस्थित राहणार आहेत.

# सांगलीत गुरुवारपासून द्राक्ष महोत्सव

**सांगली :** नागरिकांना चांगल्या प्रतीचे द्राक्ष मिळावेत आणि द्राक्ष फळासंबंधी ग्राहकांमध्ये जागरुकता निर्माण व्हावी, या प्रमुख हेतून गुरुवार दि. ७ ते शुक्रवार दि. ८ मार्च या कालावधीत सांगलीतील कच्छी जैन भवन येथे द्राक्ष महोत्सवाचे आयोजन केले आहे. या महोत्सवाचे उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांच्या हस्ते होणार आहे. या महोत्सवासाठी द्राक्ष बागायतदार संघ, राज्य शासनाचा कृषी विभाग, रासायनिक खते व कीटकनाशक उत्पादन घेणाऱ्या कंपन्या, बेदाणा व्यापारी असोसिएशन आणि बाजार समितीने पुढाकार घेतला आहे.



द्राक्ष महोत्सव तयारीसाठी कृषी विभागात बैठक झाली. यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी विवेक कुंभार, जिल्हा गुणनियंत्रण अधिकारी सुरेंद्र पाटील, द्राक्ष संघाचे सचिव तुकाराम शेळके, सांगली बाजार समितीचे सभापती सुजय शिंदे, कृषी निविष्ठा उद्योजक संजीव कोल्हार, दीपक राजमाने, प्रतीक शहा, रवींद्र मुडे, समीर इनामदार, अविनाश माळी, सदाशिव लांडगे, यांच्यासह विविध कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

द्राक्ष खाल्ल्याने होणारे आरोग्यासाठीचे फायदे यासंबंधी लोकांमध्ये माहिती पोहोचावी यासाठी राममंदिर चौकातील कच्छी भवनात द्राक्ष महोत्सव होणार आहे. द्राक्ष महोत्सवाच्या निमित्ताने 'महाशिवरात्र द्राक्ष दिन' म्हणून देशभरात दरवर्षी साजरा व्हावा आणि या दिवशी प्रत्येक घरोघरी आवडीने द्राक्षे आणि बेदाणे खाल्ले जावेत. ज्यामुळे द्राक्ष फळांची मागणी वाढून दरामध्ये वाढ व्हावी व शेतकऱ्यांना त्याचा फायदा व्हावा हा द्राक्ष महोत्सवाचा मुख्य उद्देश आहे.

महाशिवरात्रीला द्राक्षे खाल्ली जावीत हा संदेश सर्व देशभर पोहोचविण्याचा प्रयत्न आहे, असेही रवींद्र मुडे यांनी सांगितले.

**मागणी देशभरात वाढेल**

महाशिवरात्र द्राक्ष दिन संपूर्ण भारतभर भविष्यात साजरा झाला, तर द्राक्ष आणि बेदाणा फळाची मागणी वाढणार आहे. त्यामुळे द्राक्ष बागाईतदारांना आर्थिक स्थैर्य प्राप्त होईल व त्यावर अवलंबून असणारे सर्व कृषी संलग्न व्यवसायांना भरभराटीचे दिवस येतील हा उद्देश आहे. ग्राहकांच्या सोबत 'द्राक्ष महोत्सव' साजरा करूया यासाठी सर्वांच्या उपस्थितीची व सहकार्याची आवश्यकता आहे, असे आवाहन द्राक्ष बागायतदार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# लोकसभा निवडणुकीसाठी ७ टप्प्यात मतदानाची शक्यता, १४-१५ मार्चला तारखा जाहीर होणार?

**मुंबई :** निवडणूक आयोगाकडून १४ मार्च रोजी देशातील सार्वत्रिक निवडणुकीची घोषणा होण्याची शक्यता आहे. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, २०१९ प्रमाणेच यंदाही सात टप्प्यामध्ये मतदान होणार आहे. एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यात पहिल्या टप्प्यातील मतदान होण्याची शक्यता आहे.

१६ जून २०२४ रोजी १७ व्या लोकसभेचा कार्यकाळ पूर्ण होणार आहे. त्यामुळे निवडणूक आयोगाकडून लोकसभा निवडणुकीची तयारी सुरु झाली आहे. लोकसभा निवडणुकीच्या तयारीबाबत निवडणूक आयोगाकडून लवकरच पत्रकार परिषद घेऊन माहिती दिली जाणार आहे. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पुढील आठवड्यात कोणत्याही दिवशी निवडणुकीच्या तारखांची घोषणा होऊ शकते. त्या दिवसापासूनच आचरसंहिता लागू होईल. दरम्यान, सध्या निवडणूक आयोग देशातील सार्वत्रिक निवडणुकीच्या तयारीच्या अंतिम टप्प्यात आहे. सर्व राज्यातील परिस्थितीचा आढावा घेतला जातोय. निवडणूक आयोगाचे अधिकारी प्रत्येक राज्याचा दौरा करुन आढावा घेत आहेत. सर्व राज्यातील तयारीचा आढावा घेतल्यानंतर लोकसभा निवडणुकीच्या तारखांची घोषणा होणार आहे.



**लोकसभा निवडणूक २०१९ चा निकाल -**

२०१९ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत भाजप ३०३ जागांसह सर्वात मोठा पक्ष ठरला होता. ११ एप्रिल ते १९ मे २०१९ दरम्यान एकूण ७ टप्प्यांत या निवडणुकांमधून १७ लोकसभेमधील सर्व ५४३ खासदारांची निवड केली गेली होती. त्यापैकी ७८ खासदार महिला आहेत.

**कोणत्या टप्प्यात कोणत्या राज्यात मतदान होऊ शकतं ?**

**पहिला टप्पा-** जम्मू आणि कश्मीर, आंध्र प्रदेश, अरुणाचल प्रदेश, आसाम, बिहार, छत्तीसगड, महाराष्ट्र, मणिपूर, मेघालय, मिजोरम, नगालँड, ओडिशा, सिक्किम, तेलंगाणा, त्रिपुरा, उत्तर प्रदेश, उत्तराखंड, पश्चिम बंगाल, अंदमान, लक्षद्वीप.

**दूसरा टप्पा-** आंध्र प्रदेश, आसाम, बिहार, छत्तीसगढ, जम्मू आणि कश्मीर, कर्नाटक, महाराष्ट्र, मणिपूर, ओडिशा, तमिलनाडु, त्रिपुरा, यूपी, पश्चिम बंगाल आणि पुडुचेरी.

**तिसरा टप्पा-** आसाम, बिहार, छत्तीसगड, गुजरात, गोवा, जम्मू आणि कश्मीर, कर्नाटक, केरळ, महाराष्ट्र, ओडिशा, पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, दादरा आणि नगर हवेली, दमन आणि दीव.

**चौथा टप्पा -** बिहार, उत्तर प्रदेश, जम्मू आणि कश्मीर, झारखंड, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, ओडिशा, राजस्थान, पश्चिम बंगाल.

**पाचवा टप्पा-** राजस्थान, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, बिहार, जम्मू और कश्मीर, झारखंड, मध्य प्रदेश.

**सहावा टप्पा-** बिहार, हरियाणा, झारखंड, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, दिल्ली-एनसीआर.

**सातवा टप्पा-** उत्तराखंड, झारखंड, मध्य प्रदेश, पंजाब, बिहार, पश्चिम बंगाल, चंडीगढ, उत्तर प्रदेश, हिमाचल प्रदेश.